# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १८.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १७/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३७,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१७/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ३७.०५ लिटर दारू असा एकुण ६०,९९०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दि.१७/१२/२०२२ रोजी पोस्टे कुरूंदा येथे कलम ३०४(अ),२७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील फिर्यादीचा नवरा लक्ष्मण डुकरे हा मो.सा. जवळ टोकाई ते बोल्डा रोडवर टोकाई फाटया पुढे अंदाजे २०० मिटर वर पुलाजवळ उभे असतांना बोल्डा रोड कडुन येणाऱ्या मो.सा.क्र. एम.एच.३८ टि.४०६२ या चालकाने त्याचे ताब्यातील मो.सा.भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन त्यांचे पती चालावत असलेल्या मो.सा. ला जोराची धडक देवुन गंभीर जख्मी करून मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कुरूंदा पोलीस तपास करित आहेत.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १७/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०२ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**सार्वजनिक मालमत्ता प्रतिबंधक अधीनियम कायदयान्वये कार्यवाही :—**

दि.१७/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे येथे कलम १४७,१४८,१४९, ३५३,३३२,३३६,३२४,५०६,४२७ भादवी सह कलम ३ सार्वजनिक मालमत्ता प्रतिबंधक अधी. व कलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांनी मा.उच्च न्यायलायाचे आदेशान्वये प्रशासन काढीत असलेल्या अतिक्रमनाचा राग मनात धरून गैरकायद्याची मंडळी जमवुन यातील फिर्यादी हे ॲटो क्र .एम.एच.३८ ५१९५ मध्ये बसुन अतिक्रमन काढुन घ्या अशी अनाउसमेंट करीत असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादी व ॲटोवर तसेच पोलीस वाहनावर दगडफेक करून फिर्यादीचे डोके फोडुन जख्मी केले व शासकीय कामकाज करीत असतांना हल्ला करून दहशत निर्माण केली व वाहनांचे व शासकीय मालमत्तेचे नुकसान करून धमक्या दिल्या व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) चे उल्लंघन केले म्हणुन गुन्हा.गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.